# मार्को पोलो

मार्को पोलो हे नाव ऐकल्यावर तुम्हाला कशाची आठवण होते? पाण्यात खेळायच्या एका खेळाची? बरोबर, ते एका पाण्यातल्या खेळाचे नाव तर आहेच. पण ते एका प्रसिद्ध प्रवाश्याचे नाव सुद्धा आहे.

सुमारे सातशे वर्षांपूर्वी मार्को पोलो इटलीतून प्रवासासाठी बाहेर पडला. आणि थेट चीनच्या पूर्व किनाऱ्यापर्यंत गेला. त्यांनी निम्मं जग पालथं घातलं - आणि तेसुद्धा रस्ते आणि नकाशांशिवाय! त्याला प्रवासासाठी काही वाहने सुद्धा नव्हती. जवळ जवळ सगळा प्रवास त्याने चालतच केला. त्याला चीनला पोहोचायला तीन वर्षं लागली. तो तिथे चोवीस वर्षे राहिला आणि परतीच्या प्रवासाला त्याला आणखी तीन वर्षे लागली.

मार्को पोलोने प्रथम युरोपमधील लोकांना चीन बद्दल सांगितले. चिनी लोकांनी लावलेल्या शोधांबद्दल सांगितले. जेव्हा युरोपमध्ये नाणी वापरत होते तेव्हा चिनी लोक कागदाचे पैसे वापरत होते. चिनी लोकांनी युरोपीय लोकांच्या आधीच छपाई यंत्राचा शोध लावला होता. ते कोळश्याच्या आगीत भाजून मातीची सुंदर भांडी तयार करीत असत. (आई त्या भांड्यांना "चायना" का बरे म्हणते?) त्यांनी रेशमाच्या कोषापासून रेशीम काढायचा शोध लावला होता. त्यांनी दारूचा शोध लावला होता. पण त्याचा वापर ते युद्धात नाही तर फटाक्यामध्येच करत असत.

आता जेव्हा पाण्यात खेळताना कोणी "मार्को" असे ओरडेल, तेव्हा आधी मार्को पोलोने जगाला चीन बद्दल सांगितलेल्या छान छान गोष्टी आठवा आणि मगच "पोलो" असे उत्तर द्या!



१. मार्को पोलोने चीनच्या कोणत्या शोधांची माहिती युरोपीय लोकांना दिली?

२. मार्को पोलोने भेट दिलेल्या पाच ठिकाणांची नावे लिहा.

३. तुम्हाला कोणत्या देशाचा शोध घ्यावासा वाटतो? का?